०१।२०२४

.२४

पुण्य नगरी

मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४

# 'विवेकानंद'मध्ये रांगोळी स्पर्धेस प्रतिसाद

**कोल्हापूर :** येथील विवेकानंद महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित 'व्हेक्टर बॉर्न डिसिजेस' या विषयावर रांगोळी स्पर्धेस प्रतिसाद लाभला. गृहविज्ञान विभाग प्रमुख प्रा.डॉ.उर्मिला खोत यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यातील विजेते अनुक्रमे, सनोवर मुल्ला आणि रुशिता पोवार, वैष्णवी चव्हाण आणि कल्याणी यादव, मानसी गुरव आणि दिव्या गायकवाड. विजेत्यांचा विभागप्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा. व्ही. व्ही. मिसाळ यांनी प्रास्ताविक केले.

तरुण भारत
मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४



जयसिंगपूर : जिल्हास्तरीय युवा महोत्सवात दीपनृत्य सादर करताना विद्यार्थिनी.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवात १५ कलाप्रकारांचे सादरीकरण

■ शिवाजी विद्यापीठातर्फे जयसिंगपूर कॉलेज येथे आयोजन

प्रतिनिधी
जयसिंगपूर

येथील जयसिंगपूर कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठाचा कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सव विविध सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून झाला. यामध्ये १५ कला प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले.

युवा महोत्सवात विविध कला प्रकारांचा निकाल रात्री उशिरा जाहीर झाला. सुगम गायन : प्रथम– सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, द्वितीय– न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय– देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर, उत्तेजनार्थ– चंद्राबाई शांतांप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी, भोगावती महाविद्यालय कुरुकली, एकल लोकवाद्य वादन – प्रथम– दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी, द्वितीय– न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय– विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, उत्तेजनार्थ– सर्व अधिविभाग कोल्हापूर, के. आय.टी चे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कोल्हापूर.

मराठी वक्तृत्व : प्रथम – यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, द्वितीय– जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर, तृतीय– शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, उत्तेजनार्थ– राजाराम महाविद्यालय कोल्हापूर व विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. हिंदी वक्तृत्व– प्रथम– न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय– दूधसागर महाविद्यालय बिद्री, तृतीय– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, उत्तेजनार्थ डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कोल्हापूर व श्री विजयसिंह यादव महाविद्यालय पेठवडगाव. इंग्रजी वक्तृत्व स्पर्धा : प्रथम– शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय–न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय– केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, उत्तेजनार्थ दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी व जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर. लोकनृत्य : प्रथम– जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर, द्वितीय– आजरा महाविद्यालय आजरा, तृतीय– विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, उत्तेजनार्थ सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगुड व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर, लोककला– प्रथम– न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय– डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज, तृतीय– सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, उत्तेजनार्थ– डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कोल्हापूर व भोगावती महाविद्यालय कुरुकली,

एकांकिका : प्रथम– देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, द्वितीय–न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय– दत्ताजीराव कदम कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इचलकरंजी, उत्तेजनार्थ– विवेकानंद कॉलेज कोल्हापूर व आजरा महाविद्यालय आजरा.

लघु नाटिका : प्रथम– जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर, द्वितीय– न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय– राजर्षी शाहू कला व वाणिज्य महाविद्यालय रूकडी, उत्तेजनार्थ –भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर व सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, मूकनाट्य : प्रथम– दूधसागर महाविद्यालय बिद्री, द्वितीय– दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इचलकरंजी, तृतीय– भारती विद्यापीठाचे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कोल्हापूर, उत्तेजनार्थ –विवेकानंद कॉलेज कोल्हापूर व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर. पथनाट्य : प्रथम– शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय– राजाराम महाविद्यालय कोल्हापूर, तृतीय– दूधसागर महाविद्यालय बिद्री, उत्तेजनार्थ– जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर. भारतीय समूहगीत : प्रथम– विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय– देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, तृतीय– सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, उत्तेजनार्थ– न्यू कॉलेज व राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज कोल्हापूर. वादविवाद : प्रथम– डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, कोल्हापूर, द्वितीय– सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, तृतीय– दूधसागर महाविद्यालय बिद्री, उत्तेजनार्थ–न्यू कॉलेज कोल्हापूर व श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी. प्रश्नमंजुषा : प्रथम– के.आय.टी. कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कोल्हापूर, द्वितीय– विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तृतीय– डी. डी. शिंदे सरकार कॉलेज कोल्हापूर, उत्तेजनार्थ– न्यू कॉलेज कोल्हापूर व डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कोल्हापूर.

सकाळ
कोल्हापूर, मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४

# महाराष्ट्र हायस्कूल, गुरुदेव, विवेकानंद कॉलेज विजयी

## महापालिकास्तर व्हॉलीबॉल स्पर्धा

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : महापालिका प्राथमिक शिक्षण समिती व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या वतीने आयोजित शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत १४ आणि १७ वर्षांखालील मुला-मुलींमध्ये अनुक्रमे महाराष्ट्र हायस्कूल व गुरुदेव विद्यानिकेतनने, तर १९ वर्षांखालील मुला-मुलींमध्ये विवेकानंद कॉलेजने विजेतेपद पटकाविले.

महाराष्ट्र हायस्कूलच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलांमध्ये श्री गुरुदेव विद्यानिकेतनने जीवन कल्याण माध्यमिक विद्यालयाचा दोन विरुद्ध शून्य गुणांनी पराभव करीत विजेतेपद मिळवले, तर मुलींमध्ये महाराष्ट्र हायस्कूलने गुरुदेव विद्यानिकेतनचा दोन विरुद्ध शून्य गुणांनी पराभव करीत विजेतेपदाला गवसणी घातली.

१७ वर्षांखालील मुलांमध्ये श्री गुरुदेव विद्यानिकेतनने जीवन कल्याण माध्यमिक विद्यालयाचा दोन विरुद्ध शून्य गुणांनी पराभव केला, तर मुलींमध्ये महाराष्ट्र हायस्कूलने न्यू मॉडेल इंग्लिश स्कूलचा तीन विरुद्ध शून्य गुणांनी मात करीत विजेतेपद मिळवले.

१९ वर्षांखालील मुलांमध्ये विवेकानंद कॉलेजने महावीर कॉलेजचा दोन विरुद्ध एक गुणांनी मात करीत, तर मुलींमध्ये विवेकानंदच्याच संघाने महाराष्ट्र हायस्कूलवर दोन विरुद्ध शून्य गुणांनी मात करीत विजेतेपद मिळवले.

24/09/24

24.09.24